पोलीस स्टेशन, आरमोरी जि. गडचिरोली

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** अरमोरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0010 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/01/2024 17:36

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** रविवार

**Date From (दिनांक पासून):** 14/01/2024

**Time Period (कालावधी):**

**Date To ( दिनांक पर्यंत):** 14/01/2024

**Time From (वेळेपासून):** 08:43 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 10:06 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 14/01/2024 **Time (वेळ):** 15:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 029

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/01/2024 17:36 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 16 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सोनपूर सर्व्हे क्र 22, सोनपूर सर्व्हे क्र22 शेतशिवार,आरमोरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. संतोष माधव लांजेवार
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वैरागड ,आरमोरी,अरमोरी,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वैरागड ,आरमोरी,अरमोरी,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय): शेतकरी
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9370578025

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. महेन्द्र डोमाजी बगडे | | | 1. मराविविकंपणी ,मराविविकंपणी आरमोरी,आरमोरी,अरमोरी, गडचिरोली,महाराष्ट्र,भारत-441208 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | रेडमी व समसंग कंपनीचे 02 मोबाईल किंमत 20,000/रू. | 20,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | संगणकाचे सुटे भाग | सनडीक्स कंपनीची 32 जीबी मेमरी कार्ड | 0.00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्क्म 15,00/रू. | 1,500.00 |
| 4 | इतर | घरगुती वस्तु | लाच रक्कम ठेवलेली टिशर्ट | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

21,500.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद पोलीस स्टेशन आरमोरी दिनांक 14/01/2024

नांव:- श्री. संतोष माधव लांजेवार, वय 38 वर्षे धंदा- शेती मु.पो. वैरागड ता. आरमोरी जि. गडचिरोली मो. क्र. 9370578025, 9423483994 मी दिनांक 13/01/2024 रोजी सकाळी 09.11 वा. दरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील श्री. श्रीधर भोसले यांना फोनव्दारे एका लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्याबाबत माहिती दिली. त्यानुसार दिनांक 13/01/2024 रोजी लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील पोलीस निरीक्षक श्री शिवाजी राठोड हे शासकिय पंच व स्टॉफसह शासकिय वाहनाने भंडारेश्वर मंदिर वैरागड ता. आरमोरी जि. गडचिरोली येथे 12.15 वा. पोहोचले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे मी माझे हिरो एच एफ डिलक्स नविन बिना नंबरची दुचाकी वाहनासह भंडारेश्वर मंदिर वैरागड येथे हजर होतो. त्यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने लेखी तक्रार दिली ती खालीलप्रमाणे आहे. मी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय गडचिरोली कॅम्प भंडारेश्वर मंदिर, वैरागड येथे आज दिनांक 13/01/2024 रोजी हजर येवुन तक्रार देतो की, मी वरील पत्यावर राहत असून वरील प्रमाणे काम करतो. मौजा सोनपूर येथील सर्व्हेनं. 22 मध्ये माझी स्वतःची शेती असुन त्या शेतामध्ये धानाचे पिक घेत असतो. सदर सर्व्हे.नं. मधील शेतामध्ये सन 2023 मध्ये मी बोरवेल खोदले आणि त्यासाठी नविन विज जोडणी करीता दिनांक 30/08/2023 रोजी ऑनलाईन अर्ज केला. त्यानुसार सप्टेंबर 2023 मध्ये महेन्द्र बगडे लाईनमॅन साहेब यांनी विजेचे पोलचे सर्व्हे करून देण्याकरीता तुमच्या शेतावर या म्हणून मला फोन केला आणि त्याच दिवशी आम्ही दोघेही शेतावर गेलो तेव्हा महेन्द्र बगडे लाईनमॅन साहेब यांनी मला तुमच्या शेतात सर्व्हेनुसार चार पोल बसत असुन, प्रत्येकी 20 हजार रूपये पोल प्रमाणे चार पोलचे 80 हजार रूपये लागतील परंतू मी तुला तीन पोलचा सर्व्हे करून देतो त्यामुळे तुझे 20 हजार रूपये वाचतील त्यामधून माझ्यासाठी काही पैसे खर्च करावे लागेल आणि तुम्ही खाजगी ठेकेदार कडुन पोल आणि वायर जोडणी करून घ्या असे सांगीतले. त्यानंतर डिसेबर 2023 ला विज वितरण कंपणी कार्यालय आरमोरी यांचे कडून मला डिमांड लेटर देण्यात आले. त्यानंतर महेन्द्र बगडे साहेब यांनी मला फोन करून तुमच्या शेतात विज जोडणी करायची आहे असे सांगुन शेतावर बोलाविले. त्याप्रमाणे मी शेतावर गेलो असता महेन्द्र बगडे साहेब यांनी विज जोडणी करून विज सुरू करून दिली व त्यानुसार खर्च करण्याची मागणी केली. माझी लाच रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने मी धान विकल्यानंतर व्यवस्था करतो असे सांगीतले होते. तेव्हा महेन्द्र बगडे साहेब ठिक आहे म्हणुन निघुन गेले. त्यानंतर दिनांक 10/01/2024 रोजी दुपारी अंदाजे 03.00 वाजताचे सुमारास लॉईनमन महेन्द्र बगडे साहेब यांनी त्यांचे मोबाईल नंबर 8275911716 वरून माझे मोबाईल नंबर 9370578025 वर फोन करून सांगीतले की, तुम्हाला चार पोलचे तीन पोल मध्ये सर्व्हे करून तात्काळ विज जोडणी करून दिल्याचा मोबदला म्हणून तुम्ही मला 5,000/- रूपये दया अशी लाच रक्कमेची मागणी केली. तेव्हाच मी त्यांना फोनवरच शेतावरील विजेमध्ये बिघाड असल्याचे सांगीतले. त्यावरून त्यांनी दिनांक 13/01/2024 रोजी मी तुमच्या शेतावर विज जोडणीची पाहणी करतो. तेव्हा तुम्ही मला पोलचे सर्व्हे केल्याचे 5,000/- रूपये तयार ठेवा असे म्हणून पैशाची मागणी केली आहे. श्री. महेन्द्र बगडे लॉईनमन साहेब यांचेशी माझे कोणतेही वैयक्तीक दुश्मनी नाही अथवा भांडण नाही तसेच कोणतीही आर्थीक देवाण घेवाणचे व्यवहार नाहीत. परंतु महेन्द्र बगडे लाईनमन साहेब यांनी मला चार पोलचे तीन पोल मध्ये

सर्व्हे करून तात्काळ विज जोडणी करून दिल्याचा मोबदला म्हणून 5,000/-रूपये लाच रक्कमेची मागणी केली असून त्यांना 5,000/-रूपये लाच देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने त्यांचे विरूध्द कायदेशिर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. मी सोबत आणलेले 5,000/- रूपये हे माझे वैयक्तिक बचतीतील आहे. त्यानंतर श्री. शिवाजी राठोड, पोलीस निरीक्षक यांनी त्यांचे सोबत आलेल्या स्टॉफची व शासकिय पंचांची ओळख करून दिली. श्री शिवाजी राठोड यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझी लेखी तक्रार दोन्ही पंचांना वाचण्यास दिली. त्यानंतर सदरच्या तक्रारीवर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांनी सुध्दा स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड साहेब यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 5,000/- (रू. 500/- दराच्या 10 चलनी नोटा) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म सांगीतले. तद्नंतर लाचेच्या रक्कमेस अँथ्रासिन पावडर लावली व त्याचे प्रात्याक्षीक करून दाखविले. त्यानंतर पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर श्री. महेंद्र बगडे लाईनमन यांनी 'माझी गाडी खराब झाली असल्याने मी आज येत नाही, उद्या सकाळी 08.00 वा. पावेतो येतो' असे फोन करून सांगीतल्याने पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड, साहेबांनी दोन्ही पंचासमक्ष दि. 14.01.2024 रोजी पडताळणी व सापळा कारवाई करण्याचे ठरविले. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांनी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत. आज दिनांक 14/01/2024 रोजी पडताळणी व सापळा कारवाई करण्याकरीता पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड, शासकिय पंच व स्टॉफसह शासकिय वाहनाने भंडारेश्वर मंदिर वैरागड येथे पोहचले. त्या ठिकाणी मी माझे स्वतःचे दुचाकी वाहनाने हजर होतो. पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड साहेब यांनी पंचासमक्ष गैरअर्जदाराकडे लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन माझी अंगझडती घेवुन सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत मला व दोन्ही पंचांना सविस्तर सुचना दिल्या. त्यांनतर गै.अ. महेंद्र बगडे, लाईनमॅन यांनी मला फोन करून ''मी तुझ्या शेतावर येत आहे, तु तुझ्या शेतावर जाऊन रहा असे सांगितले. त्यांनतर व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमोरी कार्ड टाकुन वेळ 08.43 वा. व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे बनियानच्या आतमध्ये लटकवून ठेवून मला पंच क्रं. 1 श्री. विनीत खोके यांचेसह माझे शेतावर माझे नविन दुचाकी वाहनाने रवाना करण्यात आले. मी माझे शेतावर हजर असतांना श्री. महेंद्र बगडे हे माझे शेतावर आले व त्यांनी मला माझे मौजा सोनपूर सर्व्हे क्र. 22 मधील शेतात नविन विज जोडणी करीता पोल सर्व्हे करून चार पोलचे तिन पोलमध्ये सर्व्हे करून तात्काळ विज जोडणी करून दिल्याचा मोबदला म्हणून 5000/-रू. लाच रक्कमेची मागणी करून तडजोडअंती 1,500/-रू. लाच रक्कम माझे शेतावरच स्विकारण्याची तयारी दर्शविली व लाच रक्कम थोडया वेळात आणुन देण्यास सांगितल्याने मी पंच क्रं. 1 सह भंडारेश्वर मंदिर वैरागड येथे परत आलो. लाच रक्कम मागणी बाबतची पडताळणी कारवाई करून परत आल्याबाबत पंच क्रं. 1 यांच्या आवाजाचा नमुना घेऊन व्हॉईस रेकॉर्डर बंद करून श्री. शिवाजी राठोड, पोलीस निरीक्षक यांनी आपले ताब्यात घेतले. त्यानंतर माझी अंगझडती घेतली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड साहेब यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषण ऐकुन व पंच क्र. 1 यांचे घडलेल्या परिस्थीतीच्या कथनावरून श्री. महेंद्र बगडे, लाईनमॅन यांनी मला मौजा सोनपूर सर्व्हे क्र. 22 मधील शेतात नविन विज जोडणी करीता पोल सर्व्हे करून चार पोलचे तिन पोलमध्ये सर्व्हे करून तात्काळ विज जोडणी करून दिल्याचा मोबदला म्हणून 5000/-रू. लाच रक्कमेची मागणी करून तडजोडअंती 1,500/-रू. लाच रक्कम माझे शेतावरच स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यानंतर मी जमा केलेल्या 5000/-रू. पैकी 3,500/- रु. मला वेळीच परत करून श्री. महेंद्र बगडे, लॉईनमॅन यांचे विरूध्द सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर माझी अंगझडती घेवून मला पंचासमक्ष अँथ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम 1,500/-रू. माझे लोअर पॅन्टच्या डाव्या बाजुचे खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर डोक्यावरची स्वेटरची टोपी काढावे असा इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले. पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांचे सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे बनियानच्या आतमध्ये लटकवून ठेवून मला पंच क्रं. 1 यांचेसह माझे स्वतःचे दुचाकी वाहनाने माझे मौजा सोनपूर सर्व्हे क्र. 22 येथील शेतावर रवाना केले. त्याचवेळी सापळा पथकातील काही

सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. मी माझे मौजा सोनपूर सर्व्हे क्र. 22 येथील शेतावर गेलो असता, गै.अ. श्री. महेंद्र बगडे यांनी ईशाऱ्याने लाच रक्कम 1500/- रू. मागीतल्याने मी अँथ्रासिन पावडर लावलेली रू. 1,500/- लाचेची रक्कम माझे लोअर पॅन्टच्या डाव्या बाजुच्या खिश्यातुन डाव्या हाताने काढुन श्री. महेंद्र बगडे, लॉईनमॅन यांना दिले असता, त्यांनी लाच रक्कम रू. 1,500/- उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हाताने मोजुन त्यांचे टिशर्टच्या डाव्या बाजूचे खिशात ठेवले. त्याच वेळी मी सापळा पथकास माझे डोक्यावरची स्वेटरची टोपी काढून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्याचवेळी सापळा पथकाने गै.अ. महेंद्र बगडे, लॉईनमॅन यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद केले व नंतर माझी अंगझडती घेण्यात आली. लाच रक्कम 1,500/- रू., 01 टिशर्ट, रेडमी कंपनीचा 1 व सॅमसंग कंपनीचा 1 असे 2 मोबाईल हे श्री. महेंद्र बगडे, लॉईनमॅन यांचेकडुन तसेच नमुद कारवाईतील मेमोरी कार्ड पंचासमक्ष जप्ती पत्रकाप्रमाणे पुराव्याकामी जप्त केले. सापळा कार्यवाही बाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री शिवाजी राठोड यांनी पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत. तरी श्री. महेंद्र डोंमाजी बगडे, वय 36 वर्षे, पद-वरिष्ठ तंत्रज्ञ, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. आरमोरी यांनी मला माझे मौजा सोनपूर सर्व्हे क्र. 22 मधील शेतात नविन विज जोडणी करीता पोल सर्व्हे करून चार पोलचे तिन पोलमध्ये सर्व्हे करून तात्काळ विज जोडणी करून दिल्याचा मोबदला म्हणून 5000/-रू. लाच रक्कम मागणी करुन तडजोडअंती 1,500/- लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारतांना रंगेहात मिळून आल्याने त्यांच्याविरूध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे. माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

Sandip Punja Mandlik(I (Inspector)) / dgpspmm8902 **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली**,** बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

पोलिस स्टेशन आरमोरी

**Name (**नाव**):** Sandip Punja Mandli
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):** dgpspmm8902

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(से.मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**